# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


अधिसूचना क्र. /रातुमनावि/विद्या/१८/८५६

दिनांक २०/१०/२०१८

## :: अधिसूचना ::

सर्व संबंधीतांच्या माहितीकरीता सूचीत करण्यात येते की, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखे अंतर्गत येणा–या कॉम्पुटर ॲप्लीकेशन विषयाची विशेष कार्य समितीची सभा दिनांक १०/१०/२०१८ रोजी संपन्न झाली. त्या सभेत खालील प्रमाणे झालेल्या निर्णयाला मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी स्विकृत करुन सदर शिफारशीला सत्र २०१८–१९ करिता लागु करण्यास मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत अभ्यासमंडळ, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केली आहे.

बी.कॉम. (कॉम्पुटर ॲप्लीकेशन) (बि.सी.सी.ए.) अभ्यासक्रमाचे पुर्वी अस्तिवात असलेले निर्देश क्र.२४/२०१७ नुसार विद्यार्थ्यांनी ए.टि.के.टि. नियमाअंतर्गत महाविद्यालंयात तृतीय सत्रात प्रवेश देण्यात आला होता. परंतु दरम्यानच्या काळात अधिष्ठाता मंडळानी गठित केलेल्या प्रारुप निर्देश समिती कडून निर्देश क्र. १६/२०१८ तयार करुन सत्र २०१८–१९ पासून लागू करण्यात आला. नवीन निर्देश क्र २४/२०१७ नुसार विविध महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना तिस–या सत्राच्या परिक्षेकरिता पात्र ठरत नसल्यामूळे विद्यापीठाने त्यांचे हिवाळी २०१८ करिता परिक्षा आवेदन पत्र अस्वीकृत केले.त्यामूळे अशा विद्यार्थ्यांना परिक्षे पासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही व या विद्यार्थ्यांना नवीन निर्देश लागू करण्यात येवू नये असा निर्णय विशेष कार्य समितीने घेतला असल्यामूळे निर्देश क्र.२४/२०१७ प्रमाणे झालेल्या प्रवेशांना फक्त २०१८–२०१९ या सत्राकरिता मान्यता देवून या विद्यार्थ्यांना परिक्षेला बसू देण्यास मा. कुलगुरुंनी मान्यता प्रदान केलेली आहे.

करिता सदर अधिसूचना संबंधितांना माहिती व अमंलबजावणीस निगर्मीत करण्यात येत असून महाविद्यालय /विभाग/संस्थेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सुविधेकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर **www.naguniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये

(डॉ. निरज खटी)
कुलसचिव(अति.प्रभार)

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

१. संलग्नित महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख व प्राचार्य, संचालीत
२. मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
३. मा. संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ,
४. उपकुलसचिव( परिक्षा,पुर्व /परिक्षा उपरांत/सामान्य प्रशासन)
५. सहायक कुलसचिव (सामान्य परिक्षा/गोपनिय/व्यावसायीक परिक्षा,
६. अधिक्षक ( निकाल विभाग),
७. प्रभारी अधिकारी (प्रकाशन विभाग),
८. उपकुलसचिव, मा. कुलगुरुंचे कार्यालय
९. स्वीय सहाय्यक, मा. प्र– कुलगुरुंचे कार्यालय
१०. डॉ.विणा प्रकाशे, माहितीशास्त्रज्ञ,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

(डॉ अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)